पुण्य नगरी

# वित्तीय संस्थांनी कर्जदारांचा सन्मान करावा : काकडे

**चंदगड : प्रतिनिधी**

नियमित कर्जफेड करणाऱ्या चांगल्या कर्जदारांमुळेच वित्तीय संस्थांची प्रगती होते. त्यामुळे सभासदांचा विश्वास संपादीत करण्याबरोबरच ग्राहकांना विनम्र व तत्पर सेवा द्या. कर्जदार, जामीनदारांचा सन्मान करा, असा सल्ला सहकार खात्याचे विभागीय सहनिबंधक अरुण काकडे यांनी दिला.



चंदगड : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना अरुण काकडे. उपस्थित एम. एल. चौगुले, डॉ. मच्छिंद्र मुरुडकर, संभाजी जाधव.

येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या चंदगड शाखेत आयोजित सभासद प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. नवी दिल्लीच्या राष्ट्रीय सहकारी संघाच्या सहकार्याने ही कार्यशाळा झाली. सहकार अधिकारी मच्छिंद्र मुरूडकर यांनी कायदा आणि वसुली याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा व सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. चंदगड शाखा सल्लागार प्रा. डॉ. राजाराम साळुंके यांनी स्वागत केले. संचालिका रेखा पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. चंदगड शाखा अध्यक्ष पुष्पा नेसरीकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, शाखा सल्लागार गुरुनाथ काणेकर, प्राचार्य एस. के. गुरबे, आय. के. स्वामी, प्रा. एस. एम. पाटील, प्रा. एस. एम. मासाळ, शिवानंद वाली संजय ढेरे, एस. के. सावंत, पी. एल. भादवणकर, शाखाधिकारी दीपक शिंदे

तरुण भारत गुरूवार, ९ सप्टेंबर २०२१

# रवळनाथ सोसायटी सहकारातील माईलस्टोन

## उपनिबंधक अरुण काकडे यांचे प्रतिपादन : चंदगड येथे सभासदांना प्रशिक्षण

प्रतिनिधी
चंदगड

सहकारातील सर्व मापदंड पूर्ण करत रवळनाथ को-ऑप हाऊसिंग फायनान्स ही संस्था सभासदांचे हित जोपासत अल्पावधीत सहकारातील माईलस्टोन ठरली आहे. अडीच हजार सभासदांना घरासाठी अर्थसहाय्य देऊन 'घरपण' जपल्याचे प्रतिपादन विभागीय उपनिबंधक अरुण काकडे यांनी केले.



चंदगड : येथे सभासद प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना विभागीय उपनिबंधक अरुण काकडे. शेजारी संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले व इतर.

रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटी, प्रधान कार्यालय गडहिंग्लज मार्फत चंदगड शाखा परिसरातील संस्थेच्या सभासदाकरीता आयोजित केलेल्या सभासद प्रशिक्षण कार्यशाळेत उद्घाटक व बीजभाषक या नात्याने ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.

स्वागत चंदगड शाखा सल्लागार प्रा. डॉ. आर. एन. साळुंके यानी केले. अरूण काकडे यांच्या हस्ते रवळनाथ प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी एम. एल. चौगुले यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. अरूण काकडे म्हणाले, सहकारात एखादी संस्था नावारूपास आणायची असेल तर संचालक मंडळाने वाहून घेतले पाहिजे. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले व संचालक मंडळाने घेतलेल्या कष्टामुळे रवळनाथ सोसायटी सहकारातील आदर्श ठरली. सहकारी अधिकारी डॉ. मच्छिंद्र मुरूडकर यांनी कायदा व वसुली या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करून कर्जप्रकरणात कर्ज घेणाऱ्या सभासद इतकाच जामीनदार ही जबाबदार असतो, असे सांगितले. यावेळी प्रा. संभाजी जाधव यांनी बहुराज्य सहकारी संस्था कायदा-२००२ कायद्यानुसार सभासदांचे कर्तव्ये, वसूली आणि जबाबदारी या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी प्रशिक्षण कार्यशाळेत ८० सभासद सहभागी झाले होते. यावेळी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव, सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार, सहभाग घेतलेल्या सभासदांना प्रमाणपत्राचे प्रातिनिधिक वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन संचालिका रेखा पोतदार यांनी केले. आभार चंदगड शाखा चेअरमन पुष्पा नेसरीकर यांनी मानले. यावेळी संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, सीईओ डी. के. मायदेव, शाखा सल्लागार नारायण काणेकर, प्रशासन अधिकारी सागर माने, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड, शाखाधिकारी दीपक शिंदे, एस. व्ही. गुरबे, आय. के. स्वामी, प्रा. एस. एम. पाटील, प्रा. एन. एम. मासाळ, शिवानंद वाली, संजय ढेरे, एस. के. सांवत, पी. एल. भादवणकर, डॉ. राजू घोरपडे उपस्थित होते.


SHREE RAVALNATH CO-OP. HOUSING FINANCE SOCIETY LTD., AJARA (MULTI-STATE)
Members' Education Programme
On The Theme
"Rights & Responsibilities of Members as per Multi-State Act, 2002 & Implications of COVID-19 on Multi-State Co-op. Societies"
DATE & TIME
VENUE